# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


क्र : मविनिआ/माअअ/17/2017/ 01602 दि. 27.02.2017

प्रति,
श्री प्रदिप ज्ञानदेव मोहरे,
प्लॅट नं. 404, नंदकुंज अपार्टमेंट,
मिलिंद नगर, गौरीपाडा,
गौरीपाडा तलावाजवळ,
कल्याण (प) - 421301.

विषय :- आपला दि. 25.01.2017 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 25.01.2017 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 25.01.2017 रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.-

| अ.क्र. | तपशील | अभिप्राय |
|---|---|---|
| | आयोगाच्या कार्यालयातील अवर सचिव पद हे पदोन्नतीने भरले आहे. सदर पद भरण्याकरिता आयोगाची घेतलेली मंजूरीची नस्ती / टिपणी इ.प्रत मिळावी. तसेच सदर अवर सचिव पदास पदोन्नती देताना नस्ती/टिपणी सोबत संबंधित जोडलेली सर्व कागदपत्रे. उदा. कार्यालयाने सादर केलेली संपूर्ण नस्ती/टिपण्या, शासन निर्णय, डिपीसी अहवाल (DPC report) आणि इतर संबंधित असलेले सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Certified Copy) मिळाव्यात. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत.<br>(या दस्तऐवजामध्ये एकूण 132 पृष्ठे आहेत) |
| | आयोगाने वेळोवळी तयार केलेली अवर सचिव आणि कक्ष अधिकारी संवर्ग पदांची 100 बिंदू नामावलीची प्रत मिळावी. तसेच, सदर 100 बिंदू नामावली शासनास मंजूरीकरिता अथवा माहितीसाठी वेळोवेळी आयोगाच्या कार्यालयाने पाठविलेल्या कार्यालयाची पत्रे आणि त्यापत्रावर शासनाच्या कार्यालयाकडून घेतलेली पोच असलेल्या पत्रांच्या साक्षांकित (सन 2001 ते सन 2017 पर्यंत) प्रती (Certified Copy) मिळाव्यात. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत.<br>(या दस्तऐवजामध्ये एकूण 8 पृष्ठे आहेत) |
| | आयोगातील कर्मचारी/अधिकारी संवर्गाची दरवर्षी प्रसिध्द केलेली सेवा ज्येष्ठता यादीच्या (सन 2001 ते 2017 पर्यंत) साक्षांकित प्रती (Certified Copy) मिळाव्यात. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या |


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| | | माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण 15 पृष्ठे आहेत) |
| | आयोगाची स्थापना 5 ऑगस्ट, 1999, रोजी झाली आहे. त्यानुसार कार्यालयातील अवर सचिव पद किती वेळा भरले व कोणत्या संवर्गातून भरले त्याची बिंदू नामावली, ज्येष्ठता सूची आणि वर्तमान पत्रात जाहिरात दिली असल्यास त्याची साक्षांकित (Certified Copy) प्रत मिळावी. | आयोगाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या अभिलेख्यानुसार अर्जदारास आवश्यक असलेल्या माहितीचे दस्ताऐवज उपलब्ध आहेत. (या दस्तऐवजामध्ये एकूण 21 पृष्ठे आहेत) |

आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध असून सदर माहिती आपणांस पुरविणेसाठी माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| १७६ | २ | ३५२/- | अंदाजे रु.१००/- | ४५२/- |
| | | | एकूण रु. | **४५२/-** |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत या कार्यालयात समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावेत.

याव्यतिरिक्त आपणांस असेही कळविण्यात येते की, आपणांस कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्याची मुभा देण्यात येत आहे. कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात येण्याअगोदर कार्यालयास कळविण्यात यावे. तसेच सदर अभिलेख्यांमधील पत्रांची छायांकित प्रती आपणांस हव्या असल्यास प्रती पृष्ठ शुल्क रू.२/- या प्रमाणे भरणा केल्यास सदर प्रती आपणांस उपलब्ध करून देण्यात येतील.

सदर दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी